MHND100005802025

## (निशाणी १ वरील आदेश )

(दिनांक ३० माहे मार्च, सन २०२६ रोजी पारीत)

अर्जदारांनी प्रस्तुतचा अर्ज बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट, १८२७ चे कलम viii नियम २ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता दाखल केला.

२.	अर्जदारांचे थोडक्यात कथन असे आहे की, अर्जदार क्र. १ ते ५ ही मयत चांदखां पि. हैदरखां पठाण यांची मुले आहेत. मयत चांदखां पि. हैदरखां पठाण हे दिनांक ०४.०३.२००१ रोजी मयत झाले आहेत. अर्जदार क्र. १ ते ५ या मुलांपैकी अर्जदार क्र. १ शेरूमिया पि. चांदखां पठाण हे दिनांक ०४.०६.२०२४ रोजी मयत झाले आहेत व अर्जदार क्र. ४ शेख आरशदाबी भ्र. जाफरसाब हे दिनांक २१.१२.२०१३ रोजी मयत झाली आहे. अर्जदारांव्यतिरिक्त मयत चांदखां पि. हैदरखां पठाण यांना इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदारांना विविध शासकीय व निमशासकीय कामाकरीता वारस प्रमाणपत्र मिळणे आवश्यक असल्याने अर्जदारांनी सदरचा अर्ज मे. कोर्टात सादर केलेला आहे.

३.	बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे नियम २ नुसार वारस प्रमाणपत्र देतांना अर्जदार हे वारस प्रमाणपत्र मिळण्यास पात्र आहे किंवा नाही हे पाहणे आवश्यक आहे. सदर बॉम्बे रेग्युलेशन ऐक्टचे वाचन केल्यानंतर मी निष्कर्षास आलो आहे की, सदर नियमाअंतर्गत वारस प्रमाणपत्र देणे म्हणजे वारस, इच्छापत्र व व्यवस्थापक इत्यादींना औपचारिक मान्यता देणे होय.

४.	अर्जदारांनी त्यांच्या कथनाचे समर्थनार्थ मयत चांदखां पि. हैदरखां पठाण यांचे मृत्यू प्रमाणपत्राची पडताळणी केलेली प्रत (निशाणी १७), मयत अर्जदार क्र. १ शेरूमिया पि. चांदखां पठाण यांचे मृत्यू प्रमाणपत्राची पडताळणी केलेली प्रत (निशाणी ११), मयत शेरूमिया पि. चांदखां पठाण यांचे आधारकार्डची पडताळणी प्रत (निशाणी १२), अर्जदार क्र.२,

३ व ५ यांचे आधारकार्डच्या पडताळणी प्रती (निशाणी १३, १४ व १६) व दि.१२.०७.२०२५ रोजीचे 'जनतेचे मत माझे मत' या वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द झालेली जाहीर नोटीसची मुळ प्रत (निशाणी १८) इत्यादी अभिलेखावर दाखल केलेले आहे.

५. अर्जदार क्र.५ कौसरबी शेख ताहेर हिने तिचे पुरावा शपथपत्र (निशाणी १०) अभिलेखावर दाखल केले असून तिचा पुरावा अबाधित आहे. सदर प्रकरणामध्ये 'जनतेचे मत माझे मत' या स्थानिक परिसरात प्रकाशीत होणा-या वर्तमानपत्रामध्ये जाहीर प्रगटन (निशाणी १८) प्रकाशित करण्यात आले आणि पर्याप्त काळासाठी आक्षेपांची वाट पाहिली परंतु कोणताही आक्षेप आला नाही. सबब अर्जदार हे वारस प्रमाणपत्र मिळण्यास पात्र आहेत. त्यामुळे मी खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आ दे श

| | |
|---|---|
| १. | अर्जदारांचा अर्ज मंजूर करण्यात येतो. |
| २. | अर्जदार हैदरखां पि. चांदखां पठाण, अय्युब पि. चांदखां पठाण व कौसरबी भ्र. ताहेर शेख हे मयत चांदखां पि. हैदरखां पठाण यांचे वारस आहेत. |
| ३. | अर्जदारांनी आवश्यक न्यायालयीन मुद्रांक शुल्क भरल्यानंतर वारस प्रमाणपत्र निर्गमीत करण्यात यावे. |

KUNDLIK SUDHAKAR KHANDARE
Digitally signed by KUNDLIK SUDHAKAR KHANDARE
Date: 2026.03.30 16:01:08 +0530

(के. एस. खंडारे)
सह दिवाणी न्यायाधीश
(क.स्तर), कंधार

दि.३०.०३.२०२६